## चंद्र सांगे चांदणीला रात्र आहे संपली

चंद्र सांगे चांदणीला रात्र आहे संपली
सूर्य हा पूर्वेस येता रात्र आहे संपली ।१
बोलण्याचे वेड त्यांना पण तरीही गप्प ते
जागती का लोक इथले बात आहे संपली ।२
जीवनाचे ध्येय त्यांच्या गाठले त्यांनी कसे
चालणे हे रोजचे पण वाट आहे संपली ।३
नियत लोकांची कशी आज मजला कळेना
वागणे त्यांचे निराळे साथ आहे संपली ।४
रोख त्यांचा ना कळावा वाटले का तसेही
सागर जरा सावध रहा लाट आहे संपली । ५।।

**- प्रकाश रामचंद्र क्षीरसागर**